## थोडक्यात...

### सेलूत जय भवानी नवरात्र महोत्सवास प्रारंभ ४३ वर्षांची परंपरा कायम; यंदा पाणी बचाव मोहीम राबविणार



(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

**सेलू–** शहरातील श्री संत गोविंद बाबा चौक, मठ गल्ली येथील जय भवानी नवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला आहे. माजी नगरसेवक कै. प्रकाशसिंह ठाकूर यांनी १९८४ मध्ये सुरू केलेल्या या महोत्सवाची ४३ वर्षांची परंपरा आजही कायम आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मंदिरात नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते. महिला व नागरिक मोठ्या संख्येने देवीच्या दर्शनासाठी येतात. कोजागिरी पौर्णिमेला शहरातून देवीचा भव्य छबिना काढण्यात येतो. यावेळी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते.यंदा दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन मंडळाने अन्य कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी शहरात पाणी बचाव मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती मंडळाच्या वतीने नागेश गणेशसिंह ठाकूर यांनी दिली.

### श्रीमती सुशीलदेवी देशमुख महिला महाविद्यालयात दांडिया उत्सव उत्साहात साजरा

(मनोज पाटिल/दै.धर्मयोध्दा)

**लातूर-** मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयामध्ये नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भव्य दांडिया व गरबा रास उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत हजेरी लावत प्रचंड प्रतिसाद दिला. या समारंभाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. आशा मुंडे यांच्या हस्ते देवी सरस्वती आणि दुर्गा मातेला वंदन करण्यात आले. प्राचार्य डॉ. आशा मुंडे यांनी विद्यार्थिनींना नवरात्र मधील दांडिया उत्सव सणांचे सांस्कृतिक महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. पारंपरिक वेशभूषा आणि संगीताची धून या प्रसंगी संपूर्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख परिधान केला होता, ज्यामुळे संगीतमय वातावरणात एक वेगळीच रंगत आली होती. या कार्यक्रमासाठी कॉलेजच्या सर्व सदस्यांनी आणि प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. हा सोहळा शिस्तबद्ध वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. या समारंभासाठी डॉ. सुषमा मंडले, डॉ. बालासाहेब भोसले, डॉ. आर. एस. कांबळे, डॉ. नामदेव काटे,डॉ. मल्लिकार्जुन करजगी, विद्यादेवी कांबळे, डॉ मुक्ता गंगथडे, डॉ. संगीता भिसे, डॉ. प्रणिता पाटील, प्रा. सुनंदा कदम, प्रा.अलका शिंदे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिंतूर तालुक्यात अवैध सावकारीचा विळखा घट्ट; सर्वसामान्यांचे संसार उद्ध्वस्त, एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडण्याची वेळ – केवळ १२ अधिकृत सावकार, शेकडो बेकायदेशीर; फायनान्सच्या नावाखाली सुरू आहे लूट – पीडितांनी लेखी तक्रार करावी – सहकार निबंधक नांदापूरकर यांचे आवाहन

(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

**जिंतूर–** जिंतूर तालुक्यात सध्या अवैध सावकारीने डोके वर काढले आहे. शहरासह बोरी, चारठाणा, येलदरी, इटोली, आडगाव, बामणी, भोगाव, वागदरवाडी या मोठ्या गावांमध्ये शेती, लग्न, आजारपण आणि शिक्षणासाठी गरजू लोकांना हाताशी धरून अव्वाच्या सव्वा व्याज आकारले जात आहे. १० टक्क्यांपासून ते २० टक्के प्रतिमहिना इतके चक्रवाढ व्याज लावून सर्वसामान्यांची आर्थिक लूट सुरू आहे. वसुलीसाठी गुंडांचा वापर, दंडेलशाही या अवैध सावकारांकडून केवळ व्याजच नव्हे, तर वसुलीसाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून दमदाटी, शिवीगाळ, घरासमोर तमाशा करणे, कोऱ्या चेकवर आणि स्टॅम्प पेपरवर सह्या घेणे असे प्रकार सर्रास सुरू आहेत. कर्ज घेतलेल्या रकमेपेक्षा कित्येक पट व्याज वसूल करूनही मूळ रक्कम तशीच ठेवली जाते. एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडून पलायन करावे लागले या जाचाचे ताजे उदाहरण म्हणजे जिंतूर शहरातील एका प्रतिष्ठित सराफ व्यापाऱ्याचे आहे. अवैध सावकारांच्या सततच्या त्रासाला आणि दंडेलशाही वसुलीला कंटाळून या व्यापाऱ्याला अखेर आपले घरदार, दुकान सोडून गावातून पळ काढावा लागला आहे. त्याने घेतलेल्या रकमेपेक्षा दुप्पट-तिप्पट रक्कम परत करूनही त्याचा छळ थांबत नव्हता, असे नागरिकांतून बोलले जात आहे. या घटनेमुळे तालुक्यातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

अधिकृत फक्त १२, अनधिकृत शेकडो या प्रकरणी आम्ही सहकार निबंधक, सहकारी संस्था, जिंतूर कार्यालयात माहिती घेतली असता धक्कादायक वास्तव समोर आले. संपूर्ण जिंतूर तालुक्यात शासनमान्य केवळ १२ अधिकृत सावकार परवाना धारक आहेत. त्यामध्येही निम्म्याहून अधिक परवाने हे सोने तारण ठेवून कायदेशीर सावकारी करणाऱ्या सराफ व्यावसायिकांकडे आहेत. ते शासनाच्या नियमानुसारच व्याज घेतात आणि दरवर्षी त्यांचे हिशोब तपासले जातात.

मात्र प्रत्यक्षात शहरात आणि गावागावात फायनान्स, मायक्रो फायनान्स, रोजगार बचत गट आणि खाजगी सावकारीच्या नावाखाली शेकडो लोक बिनापरवाना हा व्यवसाय करत आहेत. त्यांनी सहकार विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. कायदा काय सांगतो? महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार, परवान्याशिवाय सावकारी करणे हा फौजदारी गुन्हा आहे. विनापरवाना सावकारी केल्यास ५ वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. तसेच परवाना असूनही जास्त व्याज आकारल्यास परवाना रद्द करण्याचा अधिकार सहकार निबंधकांना आहे. प्रशासनाचे आवाहन - घाबरू नका, लेखी तक्रार करा याबाबत सहकार निबंधक नांदापूरकर यांनी स्पष्ट केले की, ''आमच्याकडे नोंद असलेल्या १२ परवानाधारकांचे आम्ही दरवर्षी ऑडिट करतो. पण अवैध सावकारांच्या विरोधात जोपर्यंत पीडित व्यक्ती समोर येऊन लेखी तक्रार देत नाही, तोपर्यंत आम्हाला कारवाई करणे अवघड जाते. लोक घाबरतात आणि तक्रार देत नाहीत, याचाच गैरफायदा हे अवैध सावकार घेतात.'' ''जर कोणाला अवैध सावकाराने त्रास दिला असेल, जास्त व्याज घेतले असेल, तर त्यांनी आमच्या कार्यालयात येऊन लेखी अर्ज द्यावा. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवून आम्ही संबंधित सावकारावर कडक कायदेशीर कारवाई करू आणि पोलिसात गुन्हाही दाखल करू,'' असे आश्वासन त्यांनी दिले. तरी तालुक्यातील जनतेने अवैध सावकारांच्या जाळ्यात अडकू नये आणि अडकले असल्यास तात्काळ सहकार विभाग, जिंतूर किंवा स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## उमरगा येथील सेवा संकल्प अभियान तालुकास्तरीय शिबिरास नागरीकांचा उत्फुर्त प्रतिसाद



(प्रकाश शित्रे/दै.धर्मयोध्दा)

**उमरगा–** सर्व सामान्य नागरिकांची प्रलंबित प्रशासकीय कामे मार्गी लावण्यासाठी तसेच शासकीय लाभ एकाच ठिकाणी देण्यासाठी राज्य शासनाच्या * सेवा संकल्प अभियाना अंर्तगत *उमरगा तहसील कार्यालय परिसरात दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य तालुका स्तरीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात नागरीकांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला तसेच प्रशासनातर्फे रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर ही घेण्यात आले. उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे व तहसीलदार गोविंद येरमे यांच्यासह सामाजिक बांधिलकी जपत कर्मच्याऱ्यानी व नागरीकांनी उत्फुर्तपणे रक्तदान करून प्रतीसाद दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे हे होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमरगा तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले. *नागरीकांना शासकिय कार्यालयामध्ये हेलपाटे मारावे लागु नये तसेच प्रशासकीय कामामध्ये सुलभता यावी व प्रलंबित कामे जलद गतीने पुर्ण व्हावीत यासाठी प्रशासनाने या अभियानासाठी विषेश पुढाकार घेतला आहे * असे प्रतिपादन तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले. तसेच * प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविले जात आहे. नागरीकांनी जागरूक राहून अशा शिबिरांचा आणि योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. या तालुकास्तरीय शिबीरात तालूक्यातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## भुसणी गावाजवळ भीषण अपघात, पाच जण जखमी. तिघांची प्रकृती गंभीर

(प्रकाश शित्रे/ दै.धर्मयोध्दा )

**उमरगा –** मुरूम ते उमरगा मार्गावर भुसणी गावाजवळ दि. १३ऑक्टोबर मंगळवारी दुपारी २३० वाजण्याच्या सुमारास चार चाकी व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले असून तिघांची प्रकृती गंभीर असून त्यांना प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी सोलापूर व धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की वाहाणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघाताच्या आवाजाने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी तात्काळ धाव




घेऊन जखमींना वाहानातुन बाहेर काढून पोलीस व रूग्नवाहिकेला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच मुरूम पोलीस ठाण्याचे आधिकार तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन नागरिकांच्या मदतीने जखमींना शासकीय रुग्णालय मुरूम येथे हलवण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तातडीने उपचार करून प्रकृती गंभीर असलेल्या विकास रेबु पवार (वय ३८ वर्ष), कु. शंभु विकास पवार (वय ३वर्ष) रहाणार भुसणी तांडा व निरंजन पांडुरंग बिंबळीकर (वय ४६ वर्ष) रहाणार बलसूर या तीघांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. आणि प्रियंका विकास पवार (वय ३०वर्ष), मुलगी कु. संस्कृती विकास पवार (वय५वर्ष) यांना प्रथमोपचार करण्यात आले आहे. घटनेचा पुढील तपास मुरूम पोलीस करत आहेत.

## बिगर कृषी कर्ज वसुलीलाही स्थगिती देत दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर व लघुव्यावसायिकांना दिलासा द्या मुस्लिम अधिकार परिषदेची मागणी

(जावेद पटेल/ दै.धर्मयोध्दा)

**परभणी –** राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये शेतकरी, शेतमजूर आणि लघुव्यावसायिकांना आर्थिक संकटातून दिलासा देण्यासाठी कृषी कर्जाप्रमाणेच खासगी बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या आणि इतर वित्तीय संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या बिगर कृषी कर्जांच्या वसुलीलाही स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम अधिकार परिषदेचे अध्यक्ष वहीद पटेल यांनी केली आहे. पुढील खरीप हंगामातील पिके हाती येईपर्यंत ही स्थगिती लागू करावी, अशी मागणी त्यांनी मुंबई येथे देवगिरी बंगल्यावर



उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन केली.

राज्य सरकारने राज्यातील मोठ्या भागाला दुष्काळग्रस्त घोषित करून कृषी कर्जवसुलीबाबत दिलासा देण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांकडे कृषी कर्जासोबतच खासगी बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या आणि इतर वित्तीय संस्थांचे वैयक्तिक व व्यावसायिक कर्जही थकीत आहे. दुष्काळामुळे शेतीतील उत्पादन घटले असून, रोजगाराच्या संधी कमी झाल्याने शेतकरी, शेतमजूर, छोटे दुकानदार आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्यांचे उत्पन्नही घटले आहे. परिणामी, नियमित कर्जाचे हप्ते भरणे अनेकांना अशक्य होत आहे.

अशा परिस्थितीत कर्जाचे हप्ते थकल्यानंतर वसुली एजंटांकडून तगादा लावला जात असल्याच्या आणि कर्जदारांवर दबाव आणला जात असल्याच्या तक्रारी आहेत. आर्थिक संकट आणि वसुलीच्या सततच्या त्रासामुळे काही नागरिकांना गाव सोडून अन्यत्र जाण्याची वेळ येत असल्याचे मुस्लिम अधिकार परिषदेने निदर्शनास आणून दिले आहे.

दुष्काळग्रस्त नागरिकांना दिलासा देताना केवळ कृषी कर्जाचा विचार न करता, त्यांच्या बिगर कृषी कर्जांचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे खासगी बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या आणि इतर वित्तीय संस्थांच्या बिगर कृषी कर्जवसुलीला पुढील खरीप हंगामातील पिके हाती येईपर्यंत स्थगिती द्यावी. तसेच, या कालावधीत कर्जदारांना वसुलीच्या माध्यमातून अनावश्यक त्रास होणार नाही, यासाठी शासनाने योग्य निर्देश द्यावेत, अशी मागणी परिषदेने केली असून या मागणीसंदर्भात संघटनेने यापूर्वी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही पाठपुरावा केला आहे.

## पेडगावात चोरट्यांचा धुमाकूळ; व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण गावातील पोलीस चौकी कार्यरत करून रात्रीची गस्त वाढवा; पोलीस अधीक्षकांना निवेदन



(गजानन चव्हाण/ दै.धर्मयोध्दा)

**परभणी–** परभणी तालुक्यातील मौजे पेडगाव येथे मागील १५ ते २० दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. शेतातील विद्युत मोटारी, केबल, शेती साहित्य, जनावरे आणि दुचाकी चोरीला जात असल्याने शेतकरी, व्यापारी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी बंद दुकानांचे कुलूप तोडून दुकानांमधील साहित्य व रोख रक्कम लंपास केली जात असल्याच्याही तक्रारी आहेत. या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून, चोरीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. पोलीस चौकी कार्यरत करण्याची मागणी पेडगाव येथील वाढत्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेऊन गावातील पोलीस चौकी कार्यरत करावी, रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी, चोरीच्या घटनांचा तपास करून संबंधित चोरट्यांचा शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. या मागण्यांसाठी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सुहास देशमुख यांच्यासह पेडगाव येथील ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच परभणी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले. यावेळी अब्दुल हाफिज, शेख शागीर, इर्शाद बेग, शेख निसार, शेख समीर, नारायण सालमोठे, शेख नोमान आदी ग्रामस्थ उपस्थित होते. चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालून नागरिकांना सुरक्षिततेची हमी मिळावी, यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## दि. १६ ते १९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान सायन्स कॉलेजमध्ये ज्ञानतीर्थ २०२६ युवक महोत्सवाचा कलाविष्कार! उद्घाटनाला अभिनेता भारत गणेशपुर

### समारोपाला सयाजी शिंदे यांची उपस्थिती; ११० महाविद्यालयांतील १,८०० विद्यार्थी सहभागी होणार

(मनोज पाटिल/ दै.धर्मयोध्दा)

**लातूर –** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव ज्ञानतीर्थ २०२६ यंदा १६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान नांदेड येथील सायन्स कॉलेजमध्ये रंगणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मराठी चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या उपस्थितीत होणार असून, समारोपाला अभिनेते सयाजी शिंदे उपस्थित राहणार आहेत. यंदा ११० महाविद्यालयांतील सुमारे १,८०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, युवक महोत्सवासाठीची ही विक्रमी नोंदणी असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून अनावश्यक खर्चाला फाटा देत, सामाजिक संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपत युवक महोत्सवाचे आयोजन करावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे. त्यानुसार यंदाचा महोत्सव काटकसर आणि सामाजिक जाणीव यांचा आदर्श निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे. या युवक महोत्सवाची माहिती देण्यासाठी सायन्स कॉलेजमध्ये मंगळवार, दिनांक १३ रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ही माहिती सांगण्यात आली. महोत्सवाचे उद्घाटन १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता साने गुरुजी मुख्य मंचावर होणार आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर अध्यक्षस्थानी राहतील. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए प्रवीण पाटील स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, अभिनेते भारत गणेशपुरे, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण आणि संस्थेचे सहसचिव प्रदीप नागापूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. संगीत, नृत्य, नाट्य, वाङ्मय, ललितकला आणि महाराष्ट्राच्या लोककलांशी संबंधित सुमारे ३० कलाप्रकारांमध्ये विद्यार्थी आपले कौशल्य सादर करणार आहेत. शास्त्रीय गायन, वाद्यवादन, सुगम संगीत, समूहगायन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकांकिका, मूक अभिनय, वादविवाद, वक्तृत्व, कथाकथन, चित्रकला, कोलाज, भित्तिपत्रक, रांगोळी, छायाचित्रण, मेहंदी, मातीकाम, पोवाडा, लावणी, लोकसंगीत आणि प्रबोधनात्मक जलसा अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळणार आहे. हा विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना संधी देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन करणे या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. कला, संस्कृती आणि सामाजिक जाणीव यांचा संगम घडविणारा हा महोत्सव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेला विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, प्राचार्य लक्ष्मण शिंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, महोत्सवाचे सचिव डॉ. प्रशांत सुतकर आणि सहसचिव डॉ. अश्विन बोरीकर उपस्थित होते.

## पानिपतनांदेड विशेष रेल्वे: ७९ व्या निरंकारी संत समागमासाठी दक्षिण मध्य रेल्वेकडून मोठी सुविधा



(शेख असद/ दै.धर्मयोध्दा)

**पूर्णा-** ७९ व्या वार्षिक निरंकारी संत समागमादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने नांदेडपानिपतनांदेड दरम्यान विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्रमांक ०७६३५ नांदेडपानिपत विशेष ही गाडी २१ व २७ ऑक्टोबर २०२६ रोजी हुजूर साहिब नांदेड येथून बुधवारी सकाळी ०७.४० वाजता सुटेल. ही गाडी पूर्णा, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, मनमाड, जळगाव, भुसावळ, खांडवा, इटारसी, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झासी, धोलपुर, आगरा, मथुरा, कोसिकालन, पालवल, नवी दिल्ली, बोदवाल माजरी मार्गे दुसऱ्या दिवशी सायंकाळी १७.३० वाजता पानिपत येथे पोहोचेल. या दिशेने एकूण दोन फेऱ्या असतील. गाडी क्रमांक ०७६३६ पानिपतनांदेड विशेष ही गाडी २२ व २८ ऑक्टोबर २०२६ रोजी गुरुवारी सायंकाळी १८.१५ वाजता पानिपत येथून सुटेल आणि त्याच मार्गाने तिसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी ०६.०० वाजता हुजूर साहिब नांदेड येथे पोहोचेल. या दिशेनेही एकूण दोन फेऱ्या चालवल्या जातील.

या विशेष रेल्वेमध्ये एकूण २४ डबे असतील. त्यात २ सीटिंग-कम-लगेज रेक, २ वातानुकूलित डबे, १० सामान्य शयनयान डबे आणि १० सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे समाविष्ट आहेत. सणासुदीच्या काळात व संत समागमासाठी प्रवास करणाऱ्या भाविकांना अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध करून देणे हा या विशेष रेल्वेचा उद्देश आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे रेल्वे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao